**विशेष दिवाणी दावा क्र. २००८/२०२२ मधील निशाणी क्र.५ खालील आदेश.**

**( लतिका संजीव जगताप वि. सिमा हणमंत शिंदे)**

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी विरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ (येथून पुढे थोडक्यात ''दिवाणी संहिता'' असे संबोधण्यात आलेले आहे) चा आदेश ३९ नियम १ व २ नुसार तुर्तातुर्त मनाईचा आदेश मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीच्या अर्जात थोडक्यात अशी कथने आहेत की, सदनिका क्र. ३५, कौस्तुभ को. ऑप. सोसायटी, वडगांव बु., जि. पुणे ही दावा मिळकत आहे (येथून पुढे थोडक्यात ''दावा मिळकत'' असे संबोधण्यात आलेले आहे). दावा मिळकत वादीचे वडील मयत प्रभाकर महादेव पाटील यांच्या मालकीची आहे. प्रतिवादी वादीची सख्खी बहिण आहे. वादीचे वडील दि. १०–०५–२०२१ रोजी नाशिक येथे मयत झालेले आहेत. त्यांनी दावा मिळकतीचे नोंदणीकृत बक्षीसपत्र वादी व प्रतिवादीच्या हक्कात दि. २२/०८/२०१३ रोजी लिहून ठेवलेले आहे. त्यामुळे दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी यांचा प्रत्येकी अर्धा हिस्सा आहे. प्रतिवादीने दावा मिळकतीमधील तिचा अर्धा हिस्सा वादीस रु. १० लाख मोबदल्यापोटी विक्री करण्याचे मान्य केलेले आहे. वादीने आर.टी.जी.एस. द्वारे रु. ८ लाख प्रतिवादीस दि. ११/०६/२०२१ व दि. १३/०६/२०२१ रोजी प्रतिवादीच्या बॅंक खात्यात वर्ग केलेले आहेत. उर्वरीत दोन लाख रुपये प्रतिवादीने दावा मिळकत भाडयाने दिलेल्या मोबदल्यापोटी वळते करुन घ्यायचे आहेत. अशा प्रकारे, प्रतिवादीस दावा मिळकतीच्या मोबदल्याची सर्व

रक्कम वादीने दिलेली आहे. दावा मिळकतीत वादीची कब्जे वहीवाट आहे. प्रतिवादी वादीच्या कब्जे वहिवाटीला हरकत अडथळा करीत आहे. त्यामुळे प्रस्तुतचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज आहे.

३. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे व तिची कैफीयत निशाणी १६ येथे दाखल केलेली आहे. त्यामध्ये तिची अशी कथने आहेत की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये प्रतिवादीच्या दावा मिळकतीमधील अर्धा हिश्याचे रु. १० लाखच्या मोबदल्यापोटी विक्री करण्याचे ठरल्याचे सर्व कथने खोटी आहेत. वादीने प्रतिवादीस त्यांचे वडील प्रभाकर पाटील यांच्या मृत्युपत्रामध्ये नमूद असल्याप्रमाणे बॅकेतील वडीलांच्या ठेवीमधील प्रतिवादीच्या हिश्याची रक्कम रु.८ लाख आर.टी.जी.एस. ने वर्ग केलेली आहेत. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये प्रतिवादीच्या अर्धा हिश्याची विक्री करण्याबाबत त्यांच्यात दि. ०८/०२/२०२२ रोजी समझोता लेख झाला आहे. त्या लेखाप्रमाणे वादीने कृती केलेली नाही. दावा मिळकत तिच्याच ताब्यात आहे. अंतिमतः तिने अर्ज नामंजुर करण्याची मागणी केलेली आहे.

४. मी वादी व प्रतिवादीच्या विधिज्ञाचा तोंडी युक्तीवाद ९० मिनिटे ऐकुन घेतलेला आहे.

५. वादी व प्रतिवादी यांनी विविध कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली आहेत. दाखल कागदपत्रांचे मी अवलोकन केलेले आहे.

६. पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होत असून त्यांचे मी कारणांसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी सकृतदर्शीनी केस तिच्या बाजूने असल्याचे सिध्द करते का ? | नाही. |
| २. | वादी न्यायाचा तराजू तिच्या बाजूने असल्याचे सिध्द करते का ? | नाही. |
| ३. | वादी तुर्तातुर्त मनाईचा आदेश न केल्यास तिचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल असे सिध्द करते का ? | नाही. |
| ४. | आदेश कोणता ? | अर्ज नामंजुर करण्यात आला. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ४ बाबत** –

७. सदरचे मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे पुराव्यावरील चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीत विचारात घेण्यात आलेले आहेत.

८. वादी प्रतिवादी सख्ख्या बहीणी आहेत, दावा मिळकत दोघींचे वडील मयत प्रभाकर पाटील यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे, त्यांनी सदर मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांच्यात समान हक्कात दि. २२/०८/२०१३ रोजी नोंदणीकृत बक्षीसपत्र लिहून ठेवलेले आहे याबाबत त्यांच्यात वाद नाही.

९. वादी व प्रतिवादी दोघीही दावा मिळकतीवर फक्त त्यांचाच कब्जा आहे असे सांगत आहे. परंतु, वादी व प्रतिवादी यांनी फक्त वादी

अथवा प्रतिवादी हिचा एकटीचाच दावा मिळकतीवर कसा कब्जा आला याबाबत मात्र स्पष्टीकरण देत नाहीत. वादीचे व प्रतिवादीचे वडील मयत झालेले आहेत. दि. २२/०८/२०१३ रोजीच्या नोंदणीकृत बक्षीस पत्रानुसार दावा मिळकतीचा ताबा वादी व प्रतिवादी या दोघींना त्यांचे मयत वडील प्रभाकर पाटील यांनी दिलेला आहे. वादीच्या तथाकथित तोंडी प्रतिवादीने तिच्या दावा मिळकतीमधील अर्धा हिश्याची रु.१० लाख मोबदल्यापोटी विक्री करण्याचे कबूल केले होते या कथनाच्या आधारे वादीस दावा मिळकतीमध्ये संपूर्ण कब्जा प्राप्त होत नाही (पहा– मालमत्ता हंस्तांतरण कायदा १८८२,कलम ५४).

**१०.** वादीने दि. ०८/०२/२०२२ रोजीचे त्यांच्यामध्ये नोटरीसमोर झालेला दावा मिळकतीचा समझोता लेख जबरदस्तीने करुन घेतल्याचे कथन केलेले आहे. प्रतिवादीने आर.टी.जी.एस द्वारे तिला बॅक खात्यात ८ लाख रुपये वादीच्या बॅक खात्यावरुन प्राप्त झाल्याचे कबूल केले आहे, परंतु सदर रक्कम त्यांचे वडील मयत प्रभाकर पाटील यांच्या दि. १८/०५/२०१५ रोजीच्या मृत्युपत्रात नमूद असल्याप्रमाणे प्रभाकर पाटील यांनी स्वकष्टार्जित त्यांच्या नावे बॅकेत ठेवलेल्या ठेवीमधील प्रतिवादीच्या हिश्यापोटी पाठविल्याचे कथन केलेले आहे. वादीने प्रतिवादीने दावा मिळकत भाडयने देवून त्यापोटी पैसे कमावल्याचे सांगितले आहे. प्रतिवादीने दावा मिळकत त्यांच्या मयत वडीलांनीच भाडयाने दिली होती व त्यातुन मिळालेले पैसे ठेव म्हणून ठेवल्याचे सांगितले आहे. या उभय पक्षकारांच्या विरुध्दभासी कथनांच्या संदर्भात न्यायालयास उभय पक्षकारांना पुराव्याची संधी

दिल्यानंतरच निष्कर्ष नोंदवावा लागणार आहे. सकृत दर्शनी या कथनांच्या आधारे वादी अथवा प्रतिवादी याची बाजू सत्य आहे त्यामुळे दोघापैकी फक्त एकाच पक्षकराचा दावा मिळकतीत कब्जा आहे असा निष्कर्ष न्यायालय नोंदवू शकत नाही. त्यामुळे दि. २२/०८/२०१३ रोजीच्या बक्षीस पत्रानुसार  दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी या दोघींचा ताबा आहे व त्या बक्षीसपत्रानुसार दावा मिळकतीच्या दोघीही मालक झालेल्या आहेत.

११. वादी अथवा प्रतिवादीला दावा मिळकत ही सदनिका असल्यामुळे त्यांचा अविभक्त अर्धा हिस्सा ति–हाईत पक्षकारास विकता येणार नाही अथवा ति–हाईत पक्षकार अशा परीस्थतीत अर्धा हिस्सा विकत घेणार नाही. वादी व प्रतिवादी यांची  दावा मिळकतीच्या प्रत्येक कणावर मालकी व ताबा आहे. वादीची अशी कथने नाहीत की, प्रतिवादी दावा मिळकतीस नुकसान पोहचवीत आहे. त्यामुळे सकृतदर्शनी केस वादीच्या हक्कात नसल्यामुळे वादीने तुर्तातुर्त मनाई अर्जात मागितलेल्या दादी न्यायालयास देता येणार नाही.

१२. वादी व प्रतिवादी दोघीही दावा मिळकतीच्या कब्जात असल्यामुळे व दोघीही त्याच्या मालक असल्यामुळे न्यायाचा तराजु फक्त वादीच्या हक्कात नाही.

१३. प्रतिवादी दावा मिळकतीची मालक व कब्जेदार असल्यामुळे तुर्तातुर्त मनाईचा आदेश तिच्याविरुध्द केल्यास तिचे न भरुन येणारे नुकसान

होणार आहे. उलटपक्षी, तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजुर केल्यास वादीचे कोणतेही न भरुन येणारे नुकसान होणार नाही. म्हणून मी मुद्दा क्र. १ ते ३ यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र. ४ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नामंजुर करण्यात येतो.

या अर्जाचा खर्च मुळ दाव्याच्या खर्चामध्ये समाविष्ट करण्यात यावा.

Digitally signed by MALHAR POPATRAO SHINDE
Date: 2023.04.29 11:47:09 +0000

**ठिकाण– पुणे** **(मल्हार पो. शिंदे)**
**दिनांक – २९/०४/२०२३** **११वे सह दिवाणी न्यायाधीश,**
**वरिष्ठ स्तर,पुणे.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | | V.A.Chaudhari (Steno Grade II) |
| Court Name | | 11th Jt Civil Judge Senior Division, Pune |
| Date | | 29-04-2023 |
| Order signed by the Presiding Officer On | | 29-04-2023 |
| Order uploaded on | | 29-04-2023 |